श्री.अमोल मारुती सुर्यवंशी, तत्कालीन कनिष्ठ सहाय्यक (लिपीक), पंचायत समिती जामखेड यांनी कार्यालयीन कामी गैरवर्तन केलेने विभागीय चौकशी सुरु करणेकामी सादरकर्ता व चौकशी अधिका-याची नेमणुक करणेबाबत.

अहिल्यानगर जिल्हा परिषद
सामान्य प्रशासन विभाग
जिल्हा परिषद आदेश क्रमांक साप्रवि/आस्था-३/२३९०८३१/१०६३/२०२५
अहिल्यानगर दिनांक - स्वाक्षरी खाली नमुद केलेप्रमाणे

वाचा:- १. इकडील निलंबन आदेश साप्रवि२०२३/०१/२५ दिनांक २०२३/१३५/०९२२/३-आस्था/१-
२. इकडील दोषारोपपत्र जा२०२३/०९/०६ दि २०२३/११७५/०९२२/३-आस्था/१-साप्रवि.क्र.
३. गट विकास अधिकारी, पंचायत समिती कोपरगाव यांचेकडील पत्र क्र.वशि/आस्था-१/ १८८८/२०२३ दिनांक २७/०९/२०२३ समवेत श्री सुर्यवंशी यांची पोहोच दि २७/०९/२०२३
४. गट विकास अधिकारी, पंचायत समिती कोपरगाव यांचेकडील पत्र क्र.वशि/१-आस्था/ २०६८२०२३/१०/०४ समवेत श्री सुर्यवंशी यांचा खुलासा दि २०२३/१०/२५ दिनांक २०२३/
५. महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील ६ (५)

श्री.अमोल मारुती सुर्यवंशी, कनिष्ठ सहाय्यक (लिपीक) हे पंचायत समिती जामखेड येथे कार्यरत असताना कार्यालयीन कामी कामकाजात हलगर्जीपणा व कार्यालयीन शिस्तीचे उल्लंघन करुन कार्यालयीन कामकाजात गैरवर्तन केल्याने संदर्भ क्र. १ अन्वये श्री.सुर्यवंशी यांना सेवानिलंबीत करणेत आलेले होते. संदर्भ क्र.२ अन्वयेचे ज्ञापन दोषारोप श्री.सुर्यवंशी यांना संदर्भ क्र. ३ नुसार बजाविण्यात आले. सदर ज्ञापन दोषारोप पत्रामध्ये त्यांचेवर ठेवण्यात आलेले आरोप संदर्भ क्र. ४ नुसार श्री.सुर्यवंशी यांनी त्यांचेकडील दिनांक ०४/१०/२०२३ रोजीचे खुलाशानुसार अमान्य केल्याने श्री.सुर्यवंशी, कनिष्ठ सहाय्यक (लिपीक) यांचेविरुध्द न्याय हक्काचे दृष्टीने विभागीय चौकशी करणे क्रमप्राप्त असल्याने महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील (६) च्या तरतुदीनुसार खातेनिहाय चौकशी करणेचे निश्चित करण्यात आलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणी चौकशी करणेकामी चौकशी अधिकारी, तथा सहाय्यक आयुक्त, विभागीय चौकशी (जि.प.कर्मचारी), आयुक्त कार्यालय, नाशिक विभाग, नाशिक यांची नियुक्ती करीत आहे. तसेच विभागीय चौकशीस महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ च्या नियमातील तरतुदी लागु राहतील.

तसेच महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ चे नियम ६ (५) अन्वये जिल्हा परिषदेची बाजु मांडणेकरिता सादरकर्ता अधिकारी म्हणुन श्री.अशोक बबन गाडे, सहाय्यक प्रशासन अधिकारी, पंचायत समिती जामखेड यांची नेमणुक करण्यात येत आहे. सादरकर्ता अधिकारी यांनी प्रत्येक चौकशीचे तारखेस हजर रहावे. त्याप्रमाणे संदर्भ क्रं.२ मध्ये नमुद केलेले आक्षेप व पुरावे यांचा सखोल अभ्यास करुन जिल्हा परिषदेची बाजु मांडावी.

..२

परिशिष्ट क्रमांक तीन व चार मध्ये (दोषारोपपत्र) नमुद केलेले साक्षीदार यांना पुराव्याच्या कागदपत्रांसह चौकशीच्या दिवशी हजर ठेवावे. तसेच सोबत प्राथमिक कार्याचा करावयाचा तपशिल जोडला आहे. उक्त नमुद कामी हयगय झाल्यास सादरकर्ता अधिकारी यांना जबाबदार धरण्यात येईल.

सदर आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संकेतांक क्रमांक 202510091040176 असा आहे.

**Signed by Anand Subhashlal Bhandari**
**Date: 09-10-2025 20:33:53**

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

१. विभागीय चौकशी अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, विभागीय चौकशी (जि.प.कर्मचारी), नाशिक विभाग, नाशिक. **सोबत संबंधीत प्रकरणाचे आवश्यक कागदपत्र १ ते ७२**

२. श्री.अशोक बबन गाडे, सहाय्यक प्रशासन अधिकारी, पंचायत समिती जामखेड
**व्दारा व प्रत**- गट विकास अधिकारी, पंचायत समिती जामखेड
२/-सदर आदेशाची प्रत श्री अशोक बबन गाडे, सहाय्यक प्रशासन अधिकारी, पंचायत समिती जामखेड, यांना बजावुन दिनांकित स्वाक्षरीची प्रत या कार्यालयास सादर करावी.
**सोबत संबंधीत प्रकरणाचे आवश्यक कागदपत्र पान क्र.१ ते ७२**

३. श्री.अमोल मारुती सुर्यवंशी, कनिष्ठ सहाय्यक (लिपीक) प्रा.आ.केंद्र लोणी व्यंकनाथ ता श्रीगोंदा
व्दारा :- वैद्यकिय अधिकारी, प्रा.आ.केंद्र लोणी व्यंकनाथ ता श्रीगोंदा
२/-सदर आदेशाची प्रत श्री.सुर्यवंशी ए एम, कनिष्ठ सहाय्यक यांना बजावुन दिनांकित स्वाक्षरीची प्रत या कार्यालयास सादर करावी.

स्वाक्षरी/--
(आनंद भंडारी भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर